(A High Impact Factor, Quarterly, Peer Reviewed, Referred & Indexed Journal)

NAVJYOT / Vol. XIV / Issue – I ISSN 2277-8063

# महाराष्ट्रातील महिलांचे लोकसभेमधील प्रतिनिधित्व (1999 ते 2019) :एक समाजशास्त्रीय अभ्यास

**- अभिजीत भिमराव चव्हाण.**

**- सागर दगडू मोहिते.**

---

**गोषवारा**

हा शोधनिबंध 1999, 2004, 2009, 2014 व 2019 या लोकसभा निवडणुकांमधील महाराष्ट्रामधील महिलांच्या सहभागीत्वावर प्रकाश टाकतो. महिलांच्या अल्प राजकीय सहभागीत्वाची राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक कारणे यांचा मागोवा घेण्याचा प्रयत्न करतो. भारतीय निवडणूक आयोगाने अधिकृत संकेतस्थळावर प्रकाशित केलेल्या निवडणुकांच्या निकालाच्या माहितीचे विश्लेषण या शोध निबंधामध्ये केले आहे.

**मुख्य शब्द :** महिला, लिंगभावात्मकता, लोकसभा, प्रतिनिधित्व, सहभागीत्व, मतदारसंघ,

**प्रस्तावना :**

भारतामध्ये महिलांचा राजकीय सहभाग हा स्वातंत्र्यपूर्व काळापासून सुरूच आहे. 1919 साली मोंटेस्क्यू व चेनस्पोर्ट यांनी महिलांच्या राजकीय सहभागीत्वाबद्दल एक समिती नेमली होती. यावेळी सरोजिनी नायडू व मार्गारेट यांच्या नेतृत्वाखालील महिलांच्या मंडळांनी स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीने राजकीय हक्क असावेत असे निवेदन दिले होते. परंतु ही मागणी अमान्य करण्यात आली. भारतामध्ये स्त्रियांना प्रत्यक्ष मतदानाचा अधिकार हा "भारत सरकार अधिनियम 1935" नुसार काही अटी व शर्तीसह पहिल्यांदाच मिळाला. भारतीय स्वातंत्र्य- लढ्यामध्ये पुरुषांच्या बरोबरीने स्त्रियांनी काम केलेले आपल्याला आढळून येईल. सरोजनी नायडू, ॲनी बेझंट, सुचिता कृपलानी, कस्तुरबा गांधी अशा स्त्रिया विविध सत्याग्रही आंदोलनामध्ये नेतृत्व करत होत्या. पण त्याचबरोबरीने विविध क्रांतिकारी गटांमध्ये प्रीतीलता वड्डेदार, उषा मेहता यासारख्या स्त्री क्रांतिकारी देखील सहभागी असल्याचे दिसून येईल. यावरून असे असे अनुमान निघेल की, स्त्रियांना ज्या ज्या वेळेस संधी मिळाली त्या त्या वेळेस त्यांनी आपल्या प्रतिभेच्या क्षमतेचा परिचय करून दिला आहे. स्वातंत्र्योत्तर कालावधीमध्ये भारतीय संविधानाने महिलांना पुरुषांच्या बाबी बरोबरीने समान अधिकार दिले आहेत. परंतु तरीदेखील महिलांचा राजकीय सहभाग मात्र मर्यादित असल्याचे दिसून येईल. स्वतंत्र भारताच्या पहिल्या महिला पंतप्रधान म्हणून इंदिरा गांधी यांची निवड हा या सहभागीत्वाची महत्तम पायरी होती. ई. सन.1992 साली 73 व्या आणि 74 व्या घटनादुरुस्ती मुळे स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये महिलांच्यासाठी 33 टक्के आरक्षण लागू करण्यात आले. परिणामस्वरूप महिलांचा राजकीय सहभाग वाढत गेला. मात्र हे आरक्षण स्थानिक स्वराज्य संस्थांपुरतेच मर्यादित आहे. लोकसभेला आणि राज्यविधिमंडळाला हे विधेयक लागू होत नाही. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये स्त्रियांचे प्रतिनिधित्व जरी वाढले असले तरी देखील लोकसभेमध्ये मात्र तुलनेने हे प्रमाण फारच कमी आहे.

**उद्दिष्टे :**

1. भारतीय लोकसभेमधील महाराष्ट्रातील महिलांच्या प्रतिनिधित्वाचे अध्ययन करणे.
2. महिलांच्या राजकीय सहभागीत्वाचे आकलन करणे.
3. लोकसभेसाठी राखीव मतदार संघ व अराखीव मतदार संघ यामधील महिलांचे प्रतिनिधित्व यांची तुलना करणे.

**संशोधन पद्धती :**

1. संख्यात्मक पद्धती - सदर संशोधनासाठी भारतीय निवडणूक आयोगाच्या संकेतस्थळावरील प्रकाशित संख्यात्मक माहितीचा वापर केला आहे.
2. वर्णनात्मक व विश्लेषणात्मक संशोधन पद्धती - सदर शोधनिबंधासाठी दुय्यम स्त्रोत उदाहरणार्थ ग्रंथ, पुस्तके, शोधनिबंध, नियतकालिके व इंटरनेट आधी यांचा वापर केला गेला आहे.

**नमूना निवड :**

सदर संशोधन अभ्यासासाठी सहेतुक नमूना निवड पद्धतीचा अवलंब केला आहे.

**तथ्य संकलन व विश्लेषण**

1985 साली नैरोबी मधील जागतिक स्त्री परिषदेच्या जाहीरनाम्यामध्ये असे म्हटले आहे की, "स्त्री पुरुष समतेचा विचार प्रत्यक्षात येण्यासाठी स्त्रियांनी पुरुषांच्या बरोबरीने सत्तेत भागीदारी असणे आवश्यक आहे."

"जे.एल.वूडवर्ड आणि एफ.रॉबर्ट" यांच्या मते राजकीय सहभागामध्ये पुढील कार्यांचा समावेश होतो

1. निवडणुकांच्या वेळी मतदान करणे. मतदानाद्वारे सहमती दर्शवणे किंवा विरोधी मतदान करून असमान असहमती दर्शवणे.
2. एखाद्या राजकीय पक्षाचा, दबाव गटाचा सभासद सभासद बनणे.
3. विधिमंडळ सदस्याशी संपर्क साधने. त्यांना आपल्या मागण्या अवगत करून देणे.
4. स्वतः विधिमंडळ सदस्यांसाठी निवडणूक लढवणे व राजकीय पद प्राप्ति करणे.
5. लोकांशी संपर्क साधून प्रसार माध्यमाद्वारे शासन कार्याची स्तुती करणे किंवा निंदा करणे.

1999, 2004, 2009, 2014 व 2019 या लोकसभा निवडणुकांमधील महाराष्ट्रामधील महिलांच्या सहभागीत्वावर आधारित खालील कोष्टक पहा.

| अ.क्र. | निवडणूक वर्ष | लोकसभेसाठी एकूण मतदार संघ | निवडणुकीमध्ये सहभागी महिलांची संख्या (महाराष्ट्र राज्य ) | निवडणुकीमध्ये विजयी महिलांची संख्या (महाराष्ट्र राज्य ) | निवडणुकीमध्ये डिपॉजिट जप्त झालेल्या महिलांची संख्या (महाराष्ट्र राज्य ) |
|---|---|---|---|---|---|
| 01 | 1999 | 48 | 17 | 04 | 10 |
| 02 | 2004 | 48 | 29 | 05 | 21 |
| 03 | 2009 | 48 | 55 | 03 | 45 |
| 04 | 2014 | 48 | 69 | 05 | 61 |
| 05 | 2019 | 48 | 79 | 08 | 67 |

| अ.क्र. | निवडणूक वर्ष | लोकसभेसाठी महाराष्ट्रातील एकूण राखीव मतदार संघ (महाराष्ट्र राज्य) | | निवडणुकीमध्ये राखीव मतदार संघातील विजयी महिलांची संख्या (महाराष्ट्र राज्य) | |
|---|---|---|---|---|---|
| | | अनुसूचित जाती | अनुसूचित जमाती | अनुसूचित जाती | अनुसूचित जमाती |
| 01 | 1999 | 05 | 04 | 00 | 01 |
| 02 | 2004 | 05 | 04 | 00 | 01 |
| 03 | 2009 | 05 | 04 | 00 | 00 |
| 04 | 2014 | 05 | 04 | 00 | 01 |
| 05 | 2019 | 05 | 04 | 01 | 02 |

**निरीक्षणे:**

वरील माहितीच्या आधारे पुढील निरीक्षणे आढळून येतात.

1. लोकसभेसाठी महाराष्ट्रामध्ये असणाऱ्या एकूण मतदार संघाची संख्या व निवडणूकीमध्ये सहभागी महिला उमेदवारांची संख्या यांची तुलना करता असे लक्षात येते की, महिलांचे सहभागीत्व अत्यल्प आहे.
2. निवडणुकीमध्ये विजयी महिलांची संख्या तुलनेने अत्यल्प आहे.
3. निवडणुकीमध्ये अनामत रक्कम (डिपॉजिट) जप्त झालेल्या महिलांचे प्रमाण जास्त आहे.
4. राखीव मतदार संघातील विजयी महिला उमेदवारांची संख्या ही अराखीव मतदार संघातील विजयी महिलांच्या तुलनेत कमी आहे.
5. लोकसभा निवडणुकामधील महिलांचे सहभागीत्व तसेच प्रतिनिधीत्व वाढत आहे.

**महिलांच्या अल्प राजकीय सहभागीत्वाची कारणे :**

महिलांच्या अल्प राजकीय सहभागीत्वाची विविध कारणे पुढील मुद्यांच्या आधारे स्पष्ट करता येतील.

**1. सामाजिक-सांस्कृतिक अडथळे :**

पितृसत्ताक समाजरचना व लिंगभावात्मकता – पितृसत्ताक समाजरचनेमुळे महिलांना दुय्यम सामाजिक दर्जा प्राप्त होतो. परिणाम स्वरूप त्यांच्या सामाजिक व राजकीय जीवनातील सहभागावर मर्यादा येतात. कौटुंबिक जबाबदाऱ्या– महिलेवरती कुटुंबसदस्यांच्या पालन-पोषणाची जबाबदारी असते. अपत्य संगोपन व वृद्ध सदस्यांच्या आरोग्याची काळजी घेणे ही महिलेचीच कर्तव्ये मानली जातात. या कामामध्येच महिलांचा बहुतांश वेळ खर्च होत असल्यामुळे राजकीय कार्यात सहभागी होण्यास महिलांच्याकडे वेळच शिल्लक राहत नाही.

**2. राजकीय अडथळे :**

पुरूषांचे वर्चस्व- भारतीय राजकारणावर पुरुषांचे वर्चस्व असल्याचे आढळून येईल. ही वर्चस्व फक्त संख्यात्मक नसून गुणात्मक देखील आहे. महत्वाच्या राजकीय पदावर प्रामुख्याने पुरुषांची निवड केलेली दिसून देते.

राजकीय पक्षांची मानसिकता – राजकीय पक्षांना निवडणूक जिंकून सत्तेत यायचे असते. त्यांना स्त्रियांच्या तुलनेत पुरुष जास्त "निवडून येण्याच्या क्षमतेचे" वाटतात. त्यामुळे स्त्रीयांना उमेदवारी देण्यासाठी राजकीय पक्ष जास्त उत्सुक नसतात.

पक्षीय राजकारणातील अल्प सहभाग - महिलांना सहसा राजकीय पक्षांमधील महत्त्वाच्या निर्णय घेणाऱ्या पदांच्यावर निवडले जात नाही, ज्यामुळे त्यांचा प्रभाव आणि निवडणुकीत उभे राहण्याच्या संधी कमी होतात.

**3) आर्थिक अडथळे:**

आर्थिक बाबतीत महिला बहुतांशी पुरुषांच्यावर अवलंबून असल्याचे आढळून येते. आर्थिक स्त्रोतांच्यावर नियंत्रण नसणे तसेच दिवसेंदिवस खर्चिक होणाऱ्या निवडणूका यामुळे महिलांच्या सहभागावर मर्यादा येतात.

**4) आरक्षणाचा अभाव:**

महिलांच्यासाठी लोकसभेमध्ये राखीव जागा नाहीत. तसेच महिलांना लोकसभेमध्ये 33% आरक्षण देणारे विधेयक वारंवार नामंजूर झाले आहे. यामुळेदेखील महिलांचे लोकसभेमधील प्रतिनिधित्व अपुरे असल्याचे आढळून येते.

5) नैतिक बंधने: पुरुषसत्ताक समाजामध्ये चारित्र्याचे वहन करण्याची जबाबदारी स्त्रीवरती असते. राजकीय परिप्रेक्षामध्ये असताना विरोधीपक्षांच्याकडून चारित्र्यावर शिंतोडे उडवण्याचा वारंवार प्रयत्न केला जातो. स्त्रिया यावेळी प्रमुख निशाणा ठरतात. यामुळेदेखील महिलांच्या राजकीय सहभागावर मर्यादा येतात.

**निष्कर्ष :**

1. भारतीय लोकसभेमध्ये महाराष्ट्रातील महिलांचे प्रतिनिधित्व अत्यल्प आहे याचे प्रमुख कारण समाज व्यवस्थेमधील लिंगभाव असमानता हे आहे.
2. स्त्रियांच्या अल्प राजकीय सहभागामुळे त्यांचे लोकसभेमधील प्रतिनिधित्व अपुरे आहे.
3. लोकसभेच्या राखीव मतदार संघापेक्षा अराखीव मतदार संघातून महिला उमेदवारांचे निवडून येण्याचे प्रमाण जास्त आहे

**शिफारशी :**

1. महिलांच्यासाठी राखीव जागा किंवा मतदार संघाची तरतूद करणे.
2. राजकीय पक्षांमध्ये महत्वाच्या पदांच्यावरती महिलांची नेमणूक करणे. राजकीय पक्षांमध्ये महिलांच्यासाठी राखीव जागा किंवा आरक्षण असणे.
3. राजकीय पक्षांनी अधिकाधिक महिला उमेदवारांना तिकिटे देणे.
4. शासकीय योजनांची योग्य अंमलबजावणी - महिलांसाठी असणाऱ्या शासकीय योजना प्रामुख्याने त्यांच्या सामाजिक व आर्थिक दर्जा उंचावण्यासाठी असतात. या योजनांची प्रभावी अंमलबजावणी झाल्यास महिलांचा सामाजिक व आर्थिक दर्जा वाढेल आणि त्यांच्या परिणामस्वरूप राजकीय दर्जा वाढण्यास सहाय्यक ठरेल.
5. महिला चळवळ- विविध सामाजिक प्रश्नाच्या भोवती निर्माण होणाऱ्या चळवळीद्वारे स्त्री नेतृत्वाला संधी देणे व त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण करणे, नेतृत्वगुणास चालना देणे.
6. लिंगभावात्मकता नष्ट होईल अश्या पद्धतीच्या समाज रचनेच्या निर्मितीसाठी सर्वोतोपरी प्रयत्न करणे.

**संदर्भ :**

1. Election Commission of India, Official Website - https://eci.gov.in/
2. PRS Legislative Research. (2020). Women's Representation in Parliament.
3. United Nations Development Programme (UNDP). (2019). Gender Equality in Political Participation.
4. Rai, P. (2011). Women in Indian Politics. New Delhi: Serials Publications.
5. घडियाली,रेहाना.(2008). समकालीन भारतातील नागरी स्त्रिया, पुणे: डायमंड पब्लिकेशन.
6. कवी,माधवी.(1999). महिला कल्याण आणि विकास, नागपूर: विद्या प्रकाशन.
7. पवार,दीपक.(2013). महिलांचे राजकीय सक्षमीकरण, नागपूर: साईनाथ प्रकाशन.